**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**
**<u>महापालिका सर्वसाधारण सभा</u>**

महानगरपालिकेच्या मंगळवार, दिनांक 20/06/2017 रोजी भरलेल्या माहे जून महिन्याच्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 01.**<br>**दिनांक 20 जून 2017** | प्रश्नोत्तरे |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 02.**<br>**दिनांक 20 जून 2017** | **(ब)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 25(2) आणि (7) सह वाचावयाच्या कलम 31 अ(2) अन्वये, नामनिर्देशनाद्वारे दिनांक 01 जुलै 2017 (मध्यान्ही) पासून पुढील कालावधी करीता परिवहन समितीवर 6 सदस्यांची *नेमणूक करणे. |
| **<u>ठराव क्र. 1670.</u>**<br>**दिनांक 20 जून 2017** | खालील 6 उमेदवारांची परिवहन समितीचे सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली आहे, असा अहवाल मी परिवहन समितीच्या माहितीसाठी सादर करित आहे:-<br>**1.** श्री. विक्रम(राजू) धनाजी शिंदे,<br>**2.** ॲड. अब्दुल जब्बार खान,<br>**3.** श्री. राजेंद्र पुनाजी इंगळे,<br>**4.** श्री. अब्दुल्ला उर्फ समिर अमित बागवान,<br>**5.** श्री. काशिनाथ जनार्दन पाटील,<br>6. श्री. सुधिर ज्ञानदेव पवार.” |
| **निर्णय -** | **<u>परिवहन समितीवर 06 सदस्य नियुक्ती</u>** |
| **विषय क्र. 03.**<br>**दिनांक 20 जून 2017** | **आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समितीचा, दिनांक 20 मे 2017 रोजीचा ठराव क्र.03 :-**<br>नमुंमपाच्या सार्वजनिक रुग्णालय वाशी येथील रुग्णालयात CT Scan सुविधा सुरु करणेकरीता प्रशासकिय मान्यता मिळणे बाबतच्या प्रस्तावाबाबत, मा. आयुक्तांचे दिनांक 21/03/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/1731/2017. |
| **<u>ठराव क्र. 1671.</u>**<br>**दिनांक 20 जून 2017** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक रुग्णालय वाशी येथील रुग्णालयात सीटी स्कॅन सुविधा सुरु करण्याच्या कामासंबधातील प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबींसह वार्षिक अपेक्षित खर्च रक्कम रु.64 लाख, 56 हजार मात्र व त्यानुसार पाच वर्षे कालावधीकरीताचा एकुण रक्कम रु.03 कोटी, 22 लाख, 80 हजार मात्र इतक्या खर्चास, तसेच बाब क्र. 02 मध्ये निम्ननिर्देशित बाबीत नमुद केल्यानुसार (1) मेडिको लिगल केस, जेष्ठ नागरीक, दारिद्रय रेषेखालील(बीपीएल) |

| | |
|---|---|
| | आणि सर्व राष्ट्रीय कार्यक्रमाशी संबधीत नमुंमपा रुग्णालयात उपचार घेणारे रुग्ण यांना विनाशुल्क सेवा देणेस, (2) रुपये 03 लाखाच्या आतील उत्पन्न धारकास प्राप्त निविदाकाराच्या प्रस्तावित दराच्या 50 टक्के दर आकारणेस, (3) रुपये 03 लाखाच्या वरील उत्पन्न धारक असलेल्या नवी मुंबईतील रहिवाशी असेल त्यास प्राप्त निविदाकाराच्या प्रस्तावित दर आकारणेस (4) नवी मुंबई बाहेरील रुग्णास प्राप्त निविदाकाराच्या प्रस्तावित दराच्या सरसकट दिड पट दर आकारणेस (5) नोंदणी वही ऐवजी रुग्णाचे नाव रेफरन्स स्लीप तीन प्रतीत लिहीण्यास (6) सीटी स्कॅन मशीन बंद पडले तर संबधीत एजन्सीने प्रस्तावित केलेल्या दरातच रुग्णांना सुविधा उपलब्ध करुन देण्यास सुचविल्याप्रमाणे प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 04.**<br>**दिनांक 20 जून 2017** | **आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समितीचा, दिनांक 20 मे 2017 रोजीचा ठराव क्र.04 :-**<br>नमुंमपाच्या सार्वजनिक रुग्णालय ऐरोली व नेरुळ रुग्णालयात डायलेसीस सुविधा बाहययंत्रणेव्दारे सुरु करणेकरीता प्रशासकिय मान्याता मिळणेबाबतच्या प्रस्तावाबाबत मा. आयुक्तांचे दिनांक 21/03/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/1732/2017. |
| **<u>ठराव क्र. 1672.</u>**<br>**दिनांक 20 जून 2017** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक रुग्णालय ऐरोली व नेरुळ येथील रुग्णालयात डायलेसीस सुविधा बाहय यंत्रणेव्दारे सुरु करण्याच्या कामासंबधातील प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबींसह वार्षिक रक्कम रु.1 कोटी, 73 लाख, 16 हजार मात्र व त्यानुसार पाच वर्षे कालावधीकरीताचा एकुण रक्कम रु.8 कोटी, 65 लाख, 80 हजार मात्र इतक्या खर्चास, तसेच बाब क्र. 02 मध्ये निम्ननिर्देशित बाबीत नमुद केल्यानुसार (1) मेडिको लिगल केस, जेष्ठ नागरीक, दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) आणि सर्व राष्ट्रीय कार्यक्रमाशी संबधीत नमुंमपा रुग्णालयात उपचार घेणारे रुग्ण यांना विनाशुल्क सेवा देणेस, (2) रुपये 03 लाखाच्या आतील उत्पन्न धारकास प्राप्त निविदाकाराच्या प्रस्तावित दराच्या 50 टक्के दर आकारणेस, (3) रुपये 03 लाखाच्या वरील उत्पन्न धारक असलेल्या नवी मुंबईतील रहिवाशी असेल त्यास प्राप्त निविदाकाराच्या प्रस्तावित दर आकारणेस (4) नवी मुंबई बाहेरील रुग्णास प्राप्त निविदाकाराच्या प्रस्तावित दराच्या सरसकट दिड पट दर आकारणेस (5) नोंदणी वही ऐवजी रुग्णाचे नाव रेफरन्स स्लीप तीन प्रतीत लिहीण्यास (6) तसेच डायलेसीस मशीन बंद पडले तर संबधीत एजन्सीने प्रस्तावित केलेल्या दरातच रुग्णांना सुविधा उपलब्ध करुन देण्यास सुचविल्या प्रमाणे प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 05.**<br>**दिनांक 20 जून 2017** | खाजगी वैद्यकिय महाविद्यालये / खाजगी वैद्यकिय संस्था यांना नवी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयातील रुग्णखाटा शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यासाठी शुल्क आकारण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 01/06/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/आस्था-2/3611/2017. |
| **<u>ठराव क्र. 1673.</u>**<br>**दिनांक 20 जून 2017** | "खाजगी वैद्यकिय महाविद्यालये / खाजगी वैद्यकिय संस्था यांना नवी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयातील रुग्णखाटा शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यासाठी शुल्क आकारण्याच्या प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तसेच कार्यक्षेत्राबाहेरील खाजगी संस्था यांना नवी मुंबई महानगरपालिकेच्या रूग्णालयात रूग्णखाटा शैक्षणिक प्रयोजनाकरीता उपलब्ध करून देण्यासाठी रूपये 50/- प्रती रूग्णखाटा, प्रति दिवस या प्रमाणे शुल्क आकारणेस, तसेच नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तसेच कार्यक्षेत्राबाहेरील खाजगी संस्थांच्या विविध अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना अनुभवासाठी व नवी मुंबई महानगरपालिका रूग्णालये व नागरी आरोग्य केंद्र येथे परवानगी देण्यास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>आरोग्य समितीकडे परत</u>** |
| **विषय क्र. 06.**<br>**दिनांक 20 जून 2017** | नेरूळ से-20 येथील सी ब्लॉक येथे गटर, रस्ता व पदपथाची दुरूस्ती करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/06/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./966/2017. |
| **<u>ठराव क्र. 1674.</u>**<br>**दिनांक 20 जून 2017** | "नेरूळ से-20 येथील सी ब्लॉक येथे गटर, रस्ता व पदपथाची दुरूस्ती करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 2 कोटी, 2 लाख, 69 हजार, 504 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |

**<u>महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी</u>**

**माहे 20 जून 2017 ची सर्वसाधारण सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्रीम. सलुजा संदीप सुतार, यांजकडून :-** "प्र. क्र. 99 अंर्तगत से. 25 येथे प्लॉट क्र. 20 सिडकोकडून हस्तांतरित करुन घेवून त्याच्यावर लवकरात लवकर कम्युनीटी सेंटर बांधणे. तसेच से. 27 येथे गार्डनची सुविधा नाही. तरी तेथे प्लॉट क्र. 23A येथे उद्यान विकसित करणे. | 15 / जून | 1675 / 20/06/2017 | मंजूर |
| 2. | **श्रीम. सलुजा संदीप सुतार, यांजकडून :-** "प्र. क्र. 99 अंर्तगत नेरुळ से. 25 से. 27, से. 23, से. 21, दारावे गांव येथे कुठेच भाजी-मच्छी मार्केटची सुविधा नाही. तरी जो पर्यंत मार्केट बांधून होत नाही तो पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात येथे मध्यवर्ती ठिकाणी ओपन मार्केट विकसित करणे. | 16 / जून | 1676 / 20/06/2017 | मंजूर |
| 3. | **श्री. सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :-** "प्र. क्र. 74 मधील तुर्भे एम.आय.डी.सी. येथून सानपाडा से. 10 जुईनगर रेल्वे स्टेशन मार्गे जो पावसाळी नाला आहे तो दरवर्षी पावसाळयात तुडूंब भरुन वाहत असतो. मागील कित्येक वर्ष सदर नाल्यातील गाळ ही काढला नसल्यामुळे सदर नाल्याची खोली कमी झाली आहे. त्यामुळे हया वर्षी डोंगर दऱ्यामार्गे सदर नाल्यात येणारे पावसाचे पाणी सानपाडा पिंपळपाडा व सानपाडा से. 10 मध्ये घुसण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर ठिकाणी असलेल्या नाल्यातील संपुर्ण गाळ काढून हया नाल्यास संरक्षक भिंत बांधावी. तसेच नाल्याच्या संरक्षक भिंतीलगत असलेल्या जागेवर मोठया प्रमाणात डेब्रीज टाकत असल्यामुळे घाणीचे साम्राज्य तयार झाले आहे. तरी सदर मोकळया जागेस तारेचे कुंपन घालून सदर ठिकाणी मोठया प्रमाणात वृक्ष लागवड करणे. | 17 / जून | 1677 / 20/06/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 4. | **श्री. सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :-** "प्र. क्र. 74 अंतर्गत सानपाडा से. 10 मध्ये असलेल्या ट्री बेल्ट मध्ये सध्यस्थित मोठया प्रमाणात डेब्रीज पडलेले असुन त्यामुळे सदर परिसरात दुर्गंधी पसरली आहे. तरी सदर ट्री बेल्ट चे सुशोभिकरण करुन सदर ठिकाणी लहान मुलांना खेळण्यासाठी खेळणी बसवावी व त्यांच्या आरोग्य स्थिरतेसाठी ओपन जिम ही तयार करणे | 18<br>जून | 1678<br>20/06/2017 | मंजूर |
| 5. | **श्री. सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :-** "प्र. क्र. 74 अंतर्गत सानपाडा से. 10 मधील ज्ञानदिप, साईकृपा, लक्ष्मी, शिवकृपा, गणेशकृपा, सरस्वती, सप्तर्षी सोसायटी अंतर्गत मलनि:स्सारण वाहिन्या अत्यंत खराब अवस्थेत असल्यामुळे त्यातील मल हे वसाहतीतील आवारात वाहत असते. सदर ठिकाणी एका सोसायटीत मलनि:स्सारण वाहिनी बदलून त्या ठिकाणी नविन मोठया व्यासाची मलनि:स्सारण वाहिनी टाकण्यात आली असून उर्वरीत सातही सोसायटीतील मलनि:स्सारण वाहिन्या बदलणे. | 19<br>जून | 1679<br>20/06/2017 | मंजूर |
| 6. | **श्री. विनोद विनायक म्हात्रे, यांजकडून :-** "प्र. क्र. 110, करावे सेक्टर 32 मधील धारण तलाव (होल्डींग पाँड) ची सुधारण व सुशोभिकरण करणे. | 20<br>जून | 1680<br>20/06/2017 | मंजूर |
| 7. | **श्री. विनोद विनायक म्हात्रे, यांजकडून :-** नवी मुंबई मध्ये होणारे आंतरराष्ट्रीय विमानतळ त्यामुळे होणारी वाहतुक कोंडी टाळण्यासाठी पामबीच रस्त्याला समांतर ऐरोली ते बेलापूर खाडीपुल येथे मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांच्यामार्फत मुंबईच्या धर्तीवर कोस्टल रोड बांधणे. | 21<br>जून | 1681<br>20/06/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 8. | **श्रीम. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 47, सेक्टर 08 मधील ओमसाई ओनर्स असोसिएशन, सिध्दीविनायक ओनर्स असोसिएशन, सेक्टर 07 मधील सहयाद्री ओनर्स असोसिएशन, शिवप्रेरणा ओनर्स असोसिएशन, व ज्ञानेश्वर माऊली ओनर्स असोसिएशन मध्ये नवीन जलवाहिनी बसविणे. | 22<br>जून | 1682<br>20/06/2017 | मंजूर |
| 9. | **श्रीम. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 47, सेक्टर 08 मधील ओमसाई ओनर्स असोसिएशन व सिध्दीविनायक ओनर्स असोसिएशन मध्ये नवीन मलनि:स्सारण वाहिनी बसविणे. | 23<br>जून | 1683<br>20/06/2017 | मंजूर |
| 10. | **श्रीम. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 47, मध्ये स्ट्रीटलाईट बसविणे. | 24<br>जून | 1684<br>20/06/2017 | मंजूर |
| 11. | **श्री. रविंद्र उध्दव इथापे, यांजकडून :-**<br>"माजी आयुक्त यांच्या मे 2016 ते मार्च 2017 या कालखंडामध्ये त्यांनी जे निर्णय घेतलेले आहेत. त्यामध्ये काही निर्णय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाला न पाळता घेतलेले आहेत. सबब, त्यांनी घेतलेल्या सर्व निर्णयांची व नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या स्तरावरील खातेनिहाय चौकशी (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2011 मध्ये कलम 56 मधील तरतुदी अन्वये) मा. स्थायी समिती यांच्याकडे करावयाचे अपील तसेच कलम 53(1) अंतर्गत मंजूर करावयाची स्वेच्छा निवृत्ती इतर विषयांवरील कायदेशीर तरतूदींचा अभ्यास करुन समर्पक निर्णय घेण्याकरीता चौकशी समिती नेमणे. | 25<br>जून | 1685<br>20/06/2017 | मंजूर |
| 12. | **श्री. रविंद्र उध्दव इथापे, यांजकडून :-**<br>"सेक्टर 19 भिमाशंकर सोसायटी ते उरण फाट्याजवळील हायटेंशन खाली लॉन लावून सुधारणा करणे. | 26<br>जून | 1686<br>20/06/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 13. | **श्री. रविंद्र उध्दव इथापे, यांजकडून :-** "सेक्टर 19अे, नेरूळ नवदुर्ग सोसायटी ते वंडर्स पार्क नाल्यालगतच्या रस्त्याची नव्याने सुधारणा करणे. | 27<br>जून | 1687<br>20/06/2017 | मंजूर |
| 14. | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-** "प्र. क्र. 59, सेक्टर 11 वाशी नवी मुंबई येथील वेलकम बुक स्टोअर्स ते कै. राधा सुदाम भोईर निवास बिल्डींग येथील कमी व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिन्या बदलून तेथे मोठया व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे व तेथील फुटपाथची सुधारणा करणे व तेथे इंटरलॉक बसविणे. | 28<br>जून | 1688<br>20/06/2017 | मंजूर |
| 15. | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-** "प्र. क्र. 29 घणसोली 2 या प्रभागात सिडको वसाहतीचा भाग येत आहे. सेक्टर 21 व 22 हे सेक्टर या प्रभागात येतात. या सेक्टर मधील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण केले नाही. त्यामुळे येथील रहिवाश्यांना खराब रस्त्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. पावसाळयात परिस्थिती अजुन बिकट होते. सदरचा भाग हा सिडको प्राधिकरणाकडून नवी मुंबई महापालिकेकडे हस्तांतरीत झाला आहे. तरी येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | 29<br>जून | 1689<br>20/06/2017 | मंजूर |
| 16. | **श्रीम. सीमा चिंतामण गायकवाड, यांजकडून :-** "प्र. क्र. 31, मधील आदीशक्ती नगर येथील बाळू पाटील यांचे घराजवळील गटर व समर्थनगर येथील कैलास पोखरकर यांचे घराजवळील गटरांची उंची वाढविणे व पदपथ दुरुस्ती करणे. | 30<br>जून | 1690<br>20/06/2017 | मंजूर |
| 17. | **श्रीम. सीमा चिंतामण गायकवाड, यांजकडून :-** "प्र. क्र. 31, मधील समर्थनगरातील प्रगती निवास जवळील रस्त्यावर हेव्ही डयुटी ब्लॉक लावणे. | 31<br>जून | 1691<br>20/06/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 18. | **श्रीम. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 101, मधील आग्रोळी उड्डाणपुलाखाली समाज हॉलमध्ये पिण्याच्या पाण्याची लाईन जोडण्यात यावी व शौचालयाची व्यवस्था करणे. | 32<br>जून | 1692<br>20/06/2017 | मंजूर |
| 19. | **श्रीम. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 101, मधील एकता विहार व निलगिरी गार्डन सोसायटी समोरील गेटजवळ नवीन आसन व्यवस्था व निवारा शेडची व्यवस्था करणे. | 33<br>जून | 1693<br>20/06/2017 | मंजूर |
| 20. | **श्रीम. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 101, मधील पारसिक हिल येथे कंटेनर पोलिस चौकीची व्यवस्था करणे. | 34<br>जून | 1694<br>20/06/2017 | मंजूर |
| 21. | **श्री. ममित विजय चौगुले, यांजकडून यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 23, ऐरोली, से. 09 व 10 येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | 35<br>जून | 1695<br>20/06/2017 | मंजूर |
| 22. | **श्री. ममित विजय चौगुले, यांजकडून :-**<br>"प्रभाग क्र. 23, ऐरोली, से. 09 व 10 येथील पदपथांवर रेलिंग बसविणे. | 36<br>जून | 1696<br>20/06/2017 | मंजूर |
| 23. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 83, जुईनगर मधील मार्केटच्या सर्व राखीव प्लॉटचे हस्तांतरण सिडकोकडून करुन घेऊन नागरिकांसाठी सुसज्ज मार्केट लवकरात लवकर बनविणे व मराठी शाळा क्र. 17 च्या बाजूला असलेल्या मोकळया जागेत शाळेचे सभागृह बनविणे. | 37<br>जून | 1697<br>20/06/2017 | मंजूर |
| 24. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 83, जुईनगर येथे मलनि:स्सारण वाहिन्या मधील पाण्यावर प्रक्रिया करून तेच पाणी परिसरातील झाडे व सोसायट्यांना मागणीनुसार पुरवून पिण्याच्या पाण्याची सार्वत्रिक बचत करणे. | 38<br>जून | 1698<br>20/06/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 25. | **श्री. विजय लक्ष्मण चौगुले, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 07, चिंचपाडा येथे ज्योर्तिलींग चाळ, जयभवानी चाळ व दत्तमंदिर परिसरात मलनि:स्सारण वाहीन्या टाकणे. | 39<br>जून | 1699<br>20/06/2017 | मंजूर |
| 26. | **श्री. विजय लक्ष्मण चौगुले, यांजकडून :-**<br>"प्र. क्र.07, चिंचपाडा येथे स्ट्रीट लाईट बसविणे. | 40<br>जून | 1700<br>20/06/2017 | मंजूर |
| 27. | **श्री. विजय लक्ष्मण चौगुले, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 07, चिंचपाडा येथील अंतर्गत रस्त्याची सुधारणा करणे. | 41<br>जून | 1701<br>20/06/2017 | मंजूर |
| 28. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>"प्र.. क्र. 12, सेक्टर-2 या ठिकाणी नवी मुंबई महानगरपालिकेच्या यु.एच.पी (U.H.P) वास्तूचे बांधकाम करण्यात येत आहे. तरी वास्तू हूशार, गरजू तसेच होतकरु विद्यार्थ्यासाठी मिशन IAS/IPS ॲकॅडमिसाठी सुभद्राआई बहूउददेशिय संस्थेच्या नावाने देणे. | 42<br>जून | 1702<br>20/06/2017 | मंजूर |
| 29. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>"प्र.. क्र. 12, सेक्टर-2 मधील एल, आय, जी ग्रृप मधील घरांवरुन विदयुत प्रवाहाच्या मोठया वाहीन्या आहेत. प्रभागातील ओव्हरहेड वायरचे 60 ते 65% काम पुर्ण झालेले असून उर्वरित राहिलेल्या ठिकाणांवरील भाग अतिसंवेदनशिल असून त्या ठिकाणाहून दररोज 5000 ते 6000 विदयार्थी शाळेतून ये-जा करीत असतात भविष्यात त्याठिकाणी अपघात होण्याची दाट शक्याता असून उर्वरित राहिलेले बी-ग्रृप, सी-ग्रृप, ई-ग्रृप, डी-ग्रृप, मधील ओव्हरहेड वायरचे काम चालू करुन भुमिगत करुन द्यावे. | 43<br>जून | 1703<br>20/06/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 30. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-** "प्र. क्र. 12, सेक्टर-2 या ठिकाणी नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत जे मोकळे भुखंड आहेत त्या भुखंडावर नवी मुंबई महानगरपालिकेने सुशोभिकरण करुन द्यावे तसेच प्रभागाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या ठिकाणी प्रियांका हॉटेल जवळ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने भव्य-दिव्य कमान बांधून देणे. | 44<br>जून | 1704<br>20/06/2017 | मंजूर |
| 31. | **श्री. सुनिल बाळाराम पाटील, यांजकडून :-** "प्र. क्र. 92, दारावे येथील कै यशवंतराव चव्हाण मैदानामध्ये नेरूळ-दारावे परिसरातील खेळाडू खेळण्यासाठी येत असतात. सदर मैदानात खेळाडूंना विश्रांती घेण्यासाठी स्टेज, तसेच प्रेक्षकांना बसण्यासाठी स्टॅण्ड व संरक्षण भिंत, गेट बांधणे. | 45<br>जून | 1705<br>20/06/2017 | मंजूर |
| 32. | **श्री. सुनिल बाळाराम पाटील, यांजकडून :-** "प्र. क्र. 92, दारावे येथील हिरा आर्केट हौसिंग सोसायटी, नवनिवारा को.हौ.सोसायटी ते गणेश कृपा सोसायटीपर्यंतचा रस्ता नादुरूस्त झाल्याने सदर रस्त्याचे डांबरीकरण व पदपथ सुधारणा करणे. | 46<br>जून | 1706<br>20/06/2017 | मंजूर |
| 33. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-** "प्र. क्र. 82, जुईनगर सेक्टर-25 गणेश मैदानात ओपन जिम करणे. | 47<br>जून | 1707<br>20/06/2017 | मंजूर |
| 34. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-** "प्र. क्र. 82, जुईनगर सेक्टर-24 येथील सिध्दीविनायक सोसायटी ते सुंदरम सोसायटीपर्यंत मलनि:स्सारण वाहिनी टाकणे. | 48<br>जून | 1708<br>20/06/2017 | मंजूर |
| 35. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-** "प्र. क्र. 82, जुईनगर सेक्टर-24 येथील स्मशानभूमीसमोरील असलेल्या भूखंडाला संरक्षणभिंत (कंपाऊंड वॉल) बांधणे. | 49<br>जून | 1709<br>20/06/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 36. | **श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-** "सिडकोने शहर नियोजन आराखड्यात घणसोली विभागातील सेक्टर 4 मध्ये खेळाचे मैदान यासाठी राखून ठेवलेला भूखंड क्रमांक 243 हा सिडकोकडून अधिग्रहीत करून त्या भूखंडाचा विकास करणे. | 50<br>जून | 1710<br>20/06/2017 | मंजूर |
| 37. | **श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-** "सिडकोने शहर नियोजन आराखड्यात घणसोली विभागात बाजार मंडई व फेरीवाला या कारणांसाठी राखून ठेवलेला भूखंड सिडकोकडून अधिग्रहीत करून त्या भूखंडाचा विकास करणे. | 51<br>जून | 1711<br>20/06/2017 | मंजूर |
| 38. | **श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-** "महासभेने बहूमताने मंजूर केलेल्या ठरावांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि त्या ठराव प्रस्ताव विषयांची वस्तुस्थितीदर्शकता पालिका सदस्यांना व समस्त जनतेला माहिती होण्यासाठी विषयवार तपशिलावर प्रसिध्दी छापील तसेच माहिती तंत्रज्ञान सेवेच्या माध्यमातून करणे. | 52<br>जून | 1712<br>20/06/2017 | मंजूर |
| 39. | **श्रीम. उज्वला विकास झंजाड :-** "नवी मुंबई महानगरपालिकेकडून सध्या सन 2000 पर्यंत नवीन नळजोडणी देत आहे. परंतु जी घरे सन 2000 नंतर बांधलेल्या घरांना त्याचा लाभ मिळत नाही. जेणेकरून नागरिकांची गैरसोय होणार नाही व त्यांना पाण्यापासून वंचित रहावे लागणार नाही याकरिता सन 2015 पर्यंतच्या घरांना (स्टँड पोस्ट) सार्वजनिक नळ कमीत - कमी लोकांमध्ये देण्यात यावा. | 53<br>जून | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 40. | **श्रीम. उज्वला विकास झंजाड :-** "प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथे सिध्दी विनायक मंदिराबाजूला असलेल्या कच्चा रस्त्याचे काँक्रीटीकरण करून तेथे हेवीड्युटी गटार बांधण्यात यावे, असे या सभेचे मत आहे. | 54<br>जून | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **41.** | **श्रीम. उज्वला विकास झंजाड :-** "प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथील पदपथांची, गटारांची दुरावस्था झाली असून प्रभागातील दुरावस्थेत असलेल्या पदपथांची व गटारांची दुरूस्ती त्वरीत करण्यात यावी, | 55 / जून | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **42.** | **श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-** "प्र. क्र. 49, कोपरखैरणे सेक्टर 9 व 10 तसेच सेक्टर 12 मधील नाल्याला सिमेंट कॉंक्रेट (P.C.C.) करणे. | 56 / जून | 1713 / 20/06/2017 | मंजूर |
| **43.** | **श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-** "प्र. क्र. 49, कोपरखैरणे साईनाथ साईकृपा हौ.सोसायटीच्या नाल्याच्या गार्डनला कंपाऊड वॉल बांधणे. | 57 / जून | 1714 / 20/06/2017 | मंजूर |
| **44.** | **श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-** "प्र. क्र. 49, कोपरखैरणे संत वामनभाऊ भगवान बाबा उद्यानाला सुसज्ज गेट बसविणे. | 58 / जून | 1715 / 20/06/2017 | मंजूर |
| **45.** | **श्रीम. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-** "प्र. क्र. 96, नेरूळ सेक्टर-16A, 16 व 18 येथील नादुरूस्त व गंजलेल्या स्ट्रीटलाईट पोलच्या जागी नवीन आकर्षक स्ट्रीटलाईट पोल बसविणे. | 59 / जून | 1716 / 20/06/2017 | मंजूर |
| **46.** | **श्रीम. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-** "प्र. क्र. 96, नेरूळ सेक्टर- 16 व 18 येथील सागरदर्शन टॉवर व सी ब्रीज टॉवर यांच्या पाठीमागे सर्विस रोडला असलेल्या जुन्या दगडी बांधकामाच्या पावसाळी गटाराची आर.सी.सी. पध्दतीने पुर्नबांधणी करणे. | 60 / जून | 1717 / 20/06/2017 | मंजूर |
| **47.** | **श्रीम. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-** "प्र. क्र. 96, नेरूळ मध्ये ठिकठिकाणी विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांकरिता निवारा शेड उभारणे. | 61 / जून | 1718 / 20/06/2017 | मंजूर |
| **48.** | **श्रीम. शुभांगी जगदिश गवते, यांजकडून :-** "प्र. क्र. 02, रामनगर मधील ईश्वरनगर मुकूंद कंपनी येथे 20 दशलक्ष लिटर ओव्हर हेड पाण्याची टाकी बांधणे. | 62 / जून | 1719 / 20/06/2017 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 49. | **श्रीम. शुभांगी जगदिश गवते, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 02, रामनगर मधील ईश्वरनगर आदर्श हायस्कूल शेजारी 12 सिटचे कंटेनर टॉयलेट बांधणे. | 63<br>जून | 1720<br>20/06/2017 | मंजूर |
| 50. | **श्री. गणेश गंगाराम म्हात्रे, यांजकडून :-**<br>"नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त लोकांना लग्न कार्यासाठी अथवा इतर कोणत्याही कार्यक्रमासाठी नेरूळ येथील आगरी-कोळी भवनाच्या भाड्यामध्ये 50% सवलत दिली जाते. त्याप्रमाणे सिडकोने बांधलेल्या वाशी येथील एक्झीबीशन सेंटर मध्ये देखील प्रकल्पग्रस्तांना भाड्यामध्ये 50% सवलत द्यावी असे सिडकोस कळविणे. | 64<br>जून | 1721<br>20/06/2017 | मंजूर |
| 51. | **श्री. गणेश गंगाराम म्हात्रे, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 111, नेरूळ मधील सेक्टर 58अे तसेच एन.आर.आय. च्या पाठीमागे असलेली खाडी विकसित करून त्या ठिकाणी नवी मुंबईतील नागरीकांसाठी पर्यटन स्थळ तयार करावे. पर्यटन स्थळ तयार झाल्यास नवी मुंबईतील सर्व नागरीकांना त्याचा लाभ होणार आहे. | 65<br>जून | 1722<br>20/06/2017 | मंजूर |
| 52. | **श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 48 पावणे-खैरणे एम.आय.डी.सी. येथील प्रत्येक घरात ओला व सुका कचऱ्यासाठी प्रत्येक घरासाठी कचराकूंडी उपलब्ध करून देणे. | 68<br>जून | 1725<br>20/06/2017 | मंजूर |
| 53. | **श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 48 पावणेगांव स्मशानभूमीमध्ये लाकडाची व्यवस्था त्याचप्रमाणे बहुउद्देशीय कर्मचारी नेमणूक करणे. | 69<br>जून | 1726<br>20/06/2017 | मंजूर |
| 54. | **श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 48 पावणे-खैरणे एम.आय.डी.सी. भागातील रस्ते व सांडपाणी रासायनिक पाणी वाहून नेण्यासाठी बंदिस्त गटारे बांधणे. | 70<br>जून | 1727<br>20/06/2017 | मंजूर |
| 55. | **श्रीम. संगीता संदिप म्हात्रे, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 45, कोपरखैरणे मधील पदपथांची दुरूस्ती लवकरात लवकर करणे. | 71<br>जून | 1728<br>20/06/2017 | मंजूर |
| 56. | **श्रीम. संगीता संदिप म्हात्रे, यांजकडून :-**<br>"प्र. क्र 45, कोपरखैरणे मधील मुख्य रस्त्यांवर (राजधानी स्वीटसमोर) से. 3, कोपरखैरणे तसेच (रोहित मसाला समोर) से. 6, कोपरखैरणे नवी मुंबई येथे हायमास्ट बसविणे. | 72<br>जून | 1729<br>20/06/2017 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **57.** | **श्रीम. संगीता संदिप म्हात्रे, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 45, कोपरखैरणे मधील से. 6, 3 व से. 7 मधील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | 73<br>———<br>जून | 1730<br>———<br>20/06/2017 | मंजूर |
| **58.** | **श्री. द्वारकानाथ बाबु भोईर, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 30, मधील घणसोली सेक्टर 15 येथील भूखंड क्र. 25 शाळेसाठी राखीव आहे. या शाळेसाठी राखीव असलेल्या महापालिकेच्या भूखंडावर शाळेची इमारत बांधणे. | 74<br>———<br>जून | 1731<br>———<br>20/06/2017 | मंजूर |
| **59.** | **श्री. द्वारकानाथ बाबु भोईर, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 30, मधील घणसोली सेक्टर 15 येथील भूखंड क्र. 27 हा भूखंड उदयानासाठी राखीव आहे. या महापालिकेच्या भूखंडामध्ये उद्यान विकसित करणे. | 75<br>———<br>जून | 1732<br>———<br>20/06/2017 | मंजूर |
| **60.** | **श्री. द्वारकानाथ बाबु भोईर, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 30, मधील घणसोली सेक्टर 13 येथील भूखंड क्र. 01 हा क्रिडा संकुलासाठी राखीव आहे. या महापालिकेच्या राखीव भूखंडावर क्रिडा संकुल बांधणे. | 76<br>———<br>जून | 1733<br>———<br>20/06/2017 | मंजूर |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**